दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक १०२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.६ जुलै २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# भाजपाच्या १२ आमदारांचे निलंबन

## तालिका अध्यक्षांना धक्काबुक्की आणि शिवीगाळ केल्याप्रकरणी कारवाई

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून आज विधानसभेत सुरू झालेल्या चर्चेचं पर्यवसान आधी शाब्दिक वादात, आरोप–प्रत्यारोपात, नंतर गदारोळात आणि पुढे अक्षरशः राड्यात झालं. शेवटी, तालिका अध्यक्ष भास्कर जाधव यांना धक्काबुक्की आणि शिवीगाळ केल्याप्रकरणी भाजपाच्या १२ आमदारांवर एक वर्षाच्या निलंबनाच्या कारवाई करण्यात आली. त्यात आशिष शेलार, गिरीश महाजन यासारख्या प्रमुख नेत्यांचा समावेश आहे.**



विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सभागृहात जोरदार राडा पाहायला मिळाला. तालिका अध्यक्ष यांच्याबरोबर धक्काबुक्की आणि शिवीगाळ प्रकरणी विरोधी पक्षातील १२ आमदारांचे १ वर्षासाठी निलंबन करण्यात आले आहे.

ओबीसी आरक्षणावरील ठरावावर चर्चा सुरू असताना राजदंड उचलणे, माईक ओढणे आणि सभागृह अध्यक्षांना शिवीगाळ केल्याप्रकरणी संसदीय कामकाज मंत्री अनिल परब यांनी भाजपा आमदारांच्या निलंबनाचा ठराव मांडला आणि हा ठराव आवाजी बहुमतानं मंजूरही करण्यात आला.

काही आमदारांनी मला आई– बहिणींवरुन शिवीगाळ केली. माझ्या अंगावर धावून आले, असं सांगताना आजचा दिवस माझ्यासाठी काळा दिवस असल्याचे सांगत तालिका अध्यक्ष भास्कर जाधव यांनी नाराजी व्यक्त केली.

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी मात्र तालिका अध्यक्षांना धक्काबुक्की झाली नसल्याचा दावा केला आहे. तसेच भाजपाच्या आमदारांचे निलंबन केल्यानंतर विरोधा पक्षाने सभागृहातील कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

### निलंबन झालेले आमदार

संजय कुटे, आशिष शेलार, गिरीश महाजन, पराग अळवणी, राम सातपुते, अतुल भातखळकर, जयकुमार रावल, हरीश पिंपळे, योगेश सागर, नारायण कुचे, कीर्तीकुमार (बंटी) बागडिया, अभिमन्यू पवार

# भाजपच्या १२ आमदारांनी घेतली कोश्यारींची भेट



**दै.रायगड नगरी । मुंबई**

ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून आज विधानसभेत सुरू झालेल्या चर्चेचं पर्यवसान आधी शाब्दिक वादात, आरोप–प्रत्यारोपात, नंतर गदारोळात आणि पुढे अक्षरशः राड्यात झालं. शेवटी, तालिका अध्यक्ष भास्कर जाधव यांना धक्काबुक्की आणि शिवीगाळ केल्याप्रकरणी भाजपाच्या १२ आमदारांवर एक वर्षाच्या निलंबनाच्या कारवाई करण्यात आली. भाजपच्या निलंबित आमदारांनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेत स्वत:ची बाजू त्यांच्यासमोर मांडली. या प्रकरणी यथोचित कारवाई करण्यात येणार असल्याचं आश्वासन राज्यपालांनी दिल्याचं आमदारांनी सांगितलं.

'विधिमंडळ अधिवेशनादरम्यान आज घडलेल्या प्रकाराबद्दलची माहिती आम्ही राज्यपालांना दिली. त्यांच्याकडे आम्ही सत्यकथन केलं. घडलेल्या घटनेबद्दलचा अहवाल मागवून त्यासंदर्भात उचित कार्यवाही करण्याची विनंती आमच्याकडून राज्यपालांना करण्यात आली.

राज्यपालांनी आमची बाजू ऐकून घेतली. त्यांनी काही प्रतिप्रश्न केले. त्यानंतर त्यांनी योग्य निर्णय घेण्याची ग्वाही दिली,' अशी माहिती निलंबनाची कारवाई करण्यात आलेल्या आशिष शेलार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

## संक्षिप्त...

### 'एमपीएससी'च्या सदस्यांची पदे ३१ जुलैपर्यंत भरणार : उपमुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । पनवेल**

'एमपीएससी'चा कारभार गतिमान होऊन उमेदवारांना न्याय मिळण्यासाठी 'एमपीएससी' सदस्यांच्या सर्व जागा ३१ जुलै २०२१ अखेरपर्यंत भरण्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत केली.

'एमपीएससी' परीक्षा उत्तीर्ण होऊनही मुलाखतीच्या विलंबामुळे नियुक्ती होत नसल्याने स्वप्नील लोणकर या पुण्यातील विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची घटना दु:खदायक असून सरकारने हा विषय गांभीर्याने घेतला आहे. भविष्यात अशा घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सक्षम व्यवस्था निर्माण केली जाईल. लोणकर कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत सरकार सकारात्मक निर्णय घेईल, असेही उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहात स्पष्ट केले. 'एमपीएससी' परीक्षा उत्तीर्ण होऊनही मुलाखतीला विलंब झाल्याने आलेल्या नैराश्यातून पुण्यातील स्वप्नील लोणकर या विद्यार्थ्यांने आत्महत्या केल्याचा मुद्दा विधानसभेत चर्चेला आला होता. त्या चर्चेला उत्तर देतांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, लोणकर कुटुंबियांवर ओढवलेले दु:ख मोठे असून, राज्य सरकार लोणकर कुटुंबियांच्या दु:खात सामील आहे. लोणकर कुटुंबियांना मदत देण्याबाबत राज्य सरकार सकारात्मक निर्णय घेईल. नियुक्तीला झालेला विलंब हा न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्णय आणि कोरोना महामारीची परिस्थितीमुळे झाल्याचे सांगून कुठल्याही विद्यार्थ्यांने नैराश्यातून आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये, असे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी केले.

# सिडकोच्या लॉजिस्टिक पार्कला भूमिपुत्र बांधवांचा तीव्र विरोध

## लॉजिस्टिक पार्कला जमीन न देण्याचा शेतकऱ्यांचा निर्धार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडकोने उरण तालुक्यातील बेलोंदा खार परिसरातील आठ गावातील ७५० एकर जमिनी लॉजिस्टिक् पार्कसाठी शेतकऱ्यांचा विरोध असताना एमआरटीपी ॲक्ट नुसार अधिसूचित केल्या आहेत. या प्रकल्पासाठी शेतकऱ्यांनी सहमती द्यावी या साठी सिडकोने एकतर्फी शेतकऱ्यांना नोटिसा बजावल्या आहेत त्याच बरोबर कोणताही करार मदार न करता सुनवण्या ठेवल्या आहेत.

या प्रकल्पात सहभागी होणाऱ्या भूमिपुत्रांना कोणताही भरीव आर्थिक मोबदला मिळणार नाही, तसेच ह्या याजनेत सहभागी होणाऱ्या भूमिपुत्रांना न्यायालयात याचिका दाखल करता येणार नाही तसेच कोणताही रोजगाराचा हक्क सांगता येणार नाही असा जाचक करारनामा निति भ्रष्ट सिडकोच्या सोबत करावा लागणार आहे. भारतीय राज्य घटनेने आम्हाला दिलेल्या अधिकारावर बेकायदेशीर रित्या गदा आणण्याचा प्रयत्न सिडको मार्फत करण्यात येत आहे

सिडकोच्या लॉजिस्टिक्स पार्क मुळे येथील भूमिपुत्रांना आपल्या गावाचा त्याग करावा लागणार आहे व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधीत भूमिपुत्रांची आज जी आवस्था झाली आहे तशी या आठ गावातील बांधवांची होणार असल्याने या प्रकल्पास तीव्र विरोध होत आहे. हा प्रकल्प कर्नाळा पक्षी अभयारण्य प्रकल्पाच्या बाधित भागात येत असून प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर पर्यावरणाचा ऱ्हास होऊन समतोल बिघडणार आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक ती केंद्रीय पर्यावरण विभागाची परवानगी घेण्यात आलेली नाही.



आज दिनांक ४/७/२०२१ रोजी या प्रकल्पास हद्दपार करण्यासाठी येथील भूमिपुत्रांनी जांभूळ पाडा येथे कोविड १९ नियमांचे पालन करून ॲड. सुरेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सिडको मार्फत राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पास जमीन न देण्याची एकमुखी घोषणा ॲड. सुरेश ठाकूर यांनी उपस्थित भूमिपुत्रांना समोर जाहिर रित्या मांडली असून सर्वांनी त्यास समती दिली आहे.

तसेच या प्रकल्पा विरोधात लवकरच जाहिर आंदोलन सुरू करण्यात येईल अशी घोषणा ॲड.सुरेश ठाकूर यांनी केली. सिडकोस जर हा प्रकल्प अत्यावशक असल्यास त्यांनी शेतकऱ्यांचा सुपीक जमिनी न घेता. रिलायन्स सेझ साठी संपादित व वीस वर्षे पडीक असलेली जमीन ताब्यात घ्यावी असे सुधाकर पाटील यांनी भूमिका मांडली. या सभेस उपस्थित संतोष पवार संजय ठाकूर रमाकांत पाटील. गुरुनाथ पाटील, रामन कासकर, रुपेश पाटील, राज पाटील, रा बा म्हात्रे, पी सी मडवी, प्रा. राजेंद्र मडवी, ॲड मनोज म्हात्रे, सरपंच मुंबईकर पंकज ठाकूर आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

# विद्युत वितरण कंपनीमधील हस्तेखोरांवर नियंत्रण ठेवून वाशी मंडळाने केली ११ कोटीची वसूली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विद्युत वितरण कंपनीच्या वीज चोरांवर नियंत्रण करून वीज चोरीला प्रोत्साहन देणाऱ्या दलालांवर अंकुश ठेवून वाशी विद्युत वितरण मंडळाचे अधिक्षक अभियंता राजाराम माने यांच्या नेतृत्वाखाली विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी ११ कोटीची विक्रमी वसुली केली. त्यामध्ये पी.डी.लाईट तळोजा २७ लाख ७५ हजार, जी.टी.एल. म्हापे २ कोटी २६ लाख, लोमा आयटी पार्क २ कोटी १ लाख, पावरीका तळोजा ३६ लाख ४९ हजार, रिव्हीव रिलायलिटी तुर्भे २ कोटी २ लाख, एमटीएनएल पनवेल २२ लाख, सिडको ऑडिटोरियम ३० लाख ४९ हजार, एमटीएनएल सीबीडी ३१ लाख १२ हजार, ई.एफ. सी.रबाळे २१ लाख, व्हेनस कोल्ड स्टोरेज १८ लाख २७ हजार, मॅनटेक इंडस्ट्रीज तुर्भे १२ लाख ३१ हजार अशा कंपन्यांवर उचित कारवाई करून ११ कोटी २१ लाख रुपयांचा महसूल विद्युत वितरण कंपनीला वाशी विभागाने मिळवून दिला आहे. त्यामुळे कल्याण विभागातील दलालांना हाताशी धरुन विद्युत वितरण कंपनीचे नुकसान करणाऱ्या दलालांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

विजेची थकबाकी वसूल करण्यासाठी महावितरणतर्फे जोरदार कारवाई सुरू करण्यात आली आहे. थकबाकीसोबत जे ग्राहक विजेचा गैरवापर करीत आहेत. अशा उच्च दाबाच्या ग्राहकांवर ही महावितरणच्या अधिकाऱ्यांची करडी नजर आहे. विद्युत अधिनियम २००३ अन्वये कलम १२६ अंतर्गत एखादा ग्राहक अनधिकृतरित्या विजेचा वापर करीत असेल तर त्याला प्रॉव्हिजनल बील दिले जाते. त्यावर समोरील ग्राहकाची बाजू ऐकून घेऊन अंतिम बील देण्यात येते. संबंधित ग्राहकाला बील मान्य नसल्यास अपिलीय अधिकाऱ्यांकडे दाद मागता येते. बऱ्याचदा महावितरणची वीज वापरणारे ग्राहक त्यांच्या कंपन्यांचे अर्धवट पत्ते देतात. काही उद्योजक त्यांच्या वापरासाठी वीज घेतात आणि दुसऱ्यांना भाड्याने वीज देतात. एमआयडीसीतील सबलेट कागदपत्रे जागेवर उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे आकारण्यात येणारी ग्राहकांची प्रॉव्हिजनल बीलाची रक्कम जास्त असू शकते. त्याबाबत ग्राहकाला त्याची बाजू मांडायला पूर्ण वेळ दिला जातो. काही वेळेस ग्राहकाने महावितरणला आवश्यक असलेले कागदपत्रांची पूर्तता केल्यास प्रॉव्हिजनल बीलाची रक्कम शून्य येऊ शकते. त्यानुसार वाशी मंडळाने जानेवारी २०२० पासून मार्च २०२१ या कालावधीत कोव्हीड असताना सुद्धा एकूण ७९ उच्चदाबाच्या ग्राहकांच्या वीज संचाची तपासणी केली. तेव्हा या तपासणीत वाशी मंडळाला २९ वीज ग्राहक वीजेचा गैरवापर करीत असल्याचे उघडकीस आले. अशा ग्राहकांकडून वाशी मंडळाने ११ कोटी २१ लाख रुपयांचा महसूल गोळा केला. या कारवाई वाशी मंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या कोल्डस्टोरेजचा समावेश आहे. या कोल्डस्टोरेजच्या वीज संचाची तपासणी केली असता ४ कोल्ड स्ट्रोरेज यांनी .../२

# सरकारी कामात अडथळा व हुज्जत घालणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सरकारी कर्तव्य पार पाडताना शासकीय कामात अडथळा आणून शासकीय कर्तव्य पार पाडण्यापासून परावृत्त करून सदर पोलिस हवालदाराविरूद्ध हुज्जत घालून, कॉलर पकडून धक्काबुक्की करून कठड्यावर पाडून सरकारी गणवेशाची नेमप्लेट पिनसकट उखडून गणवेशाच्या शर्टाचे बटन तोडून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

पनवेल तालुका पोलिस ठाण्यात कार्यरत असणारे पोलिस हवालदार ठाकूर हे नेरे बीट चौकी येथे कर्तव्य बजावित असताना शांतिवन फाटा येथील नदी पात्राच्या गणपती विसर्जनाच्या घाटाच्या ठिकाणी लोकांची गर्दी होऊ नये म्हणून ते कार्यरत असताना आरोपी दुश्यंत अजय पाल (रा.–कोपरोली) याने सदर ठिकाणी हेऊन नदी पात्राच्या दिशेने जात असताना त्याला मज्ञाव केला असता तसेच कोरोना आजाराचे प्रादूर्भावामुळे सध्या लॉकडाऊन असल्याने घरी जाण्यास सांगितले असता त्याचा राग मनात घेऊन त्याने सरकारी कर्तव्य पार पाडत असलेले ठाकूर यांच्या शासकीय कामात अडथळा आणून शासकीय कर्तव्य पार पाडण्यापासून परावृत्त करून सदर .../२

# मुंबई गोवा महामार्गाला बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव द्यावे

## रायगड प्रेस क्लबच्या बैठकीत ठराव



**दै.रायगड नगरी । माणगाव**

मुंबई गोवा महामार्गाला आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव देण्यात यावे असा ठराव रायगड प्रेस क्लबच्या माणगाव येथील जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीत आला. यासाठी केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख व किरण नाईक यांच्या नेतृत्वखाली रायगड प्रेस क्लबचे पदाधिकारी यांनी भेट घेऊन तसे निवेदन देण्याचेही या बैठकीत ठरविण्यात आले.

रायगड प्रेस क्लबची विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी बैठक माणगाव येथील रिव्हर रिसॉर्ट येथे झाली. यात प्रथम कोरोना मध्ये मृत्यू झालेले जेष्ठ दिवंगत पत्रकार।दीपक शिंदे, यांना श्रद्धांजली वाहन्यात आली. नंतर जिल्हा समिती च्या नवनियुक्त पदाधिकारी यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन करण्यात आले. याच बरोबर गोरेगाव प्रेस क्लब ने कोरोना आपत्तीत रुग्णवाहिका सेवा दिली. तसेच महाड प्रेस क्लब ने ही कोव्हीड सेंटर द्वारे रुग्णसेवा करीत असल्याबद्दल त्यांचेही अभिनंदन केले. यावेळी प्रेस क्लब व्यतिरिक्त इतर संघटनेत काम करत असणाऱ्या पत्रकारावर काय निर्णय घ्यावा यावर ठराव झाला असून यात तालुका अध्यक्षांनी निर्णय घेऊन जिल्हा प्रेस .../२

# खांदा कॉलनीतील भाजप व मनसेचे कार्यकर्ते शिवसेनेत दाखल



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमधील खांदा कॉलनी शहर शाखा येथे भाजप व मनसेच्या कार्यकर्त्यांनी व परिसरातील युवकांनी शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वाखाली शिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश केला. याप्रसंगी जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी प्रवेश केलेल्या सर्व युवकांना पक्षसंघटनेच्या अनुषंगाने योग्य मार्गदर्शन केले व त्यांच्या हाती शिवबंधन बांधून शिवसेना पक्षात स्वागत केले.

याप्रसंगी रायगड जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील, युवासेना उत्तर रायगड जिल्हा विस्तारक ओंकार चव्हाण, युवासेना रायगड जिल्हा अधिकारी मयूर जोशी,सातारा जिल्हा संपर्क प्रमुख एकनाथ ओवळे, पनवेल तालुका संघटक दिपक निकम, शिवसेना उपमहानगर प्रमुख दिपक घरत, लीलाधर भोईर खांदा कॉलनी शहर प्रमुख सदानंद शिर्के, जेष्ठ शिवसैनिक विष्णू गवळी, पनवेल विधानसभा अधिकारी पराग मोहिते, पनवेल उपविधानसभा अधिकारी सुशांत सावंत, महिला आघाडीच्या उपमहानगर .../२

# काबूलमधला काळोख

दुसऱ्या महायुद्धानंतर एकीकडे सोविएत युनियन व मित्रदेश आणि दुसरीकडे अमेरिका व मित्रदेश यांच्या शीतयुद्धात भयंकर होरपळ, जुलूम आणि बरबादी अनुभवलेले जे देश आहेत; त्यांच्यात अफगाणिस्तानचा क्रमांक बराच वरचा लागेल. शीतयुद्ध संपल्यावर युरोपातील अनेक देशांचा नवा प्रवास सुरू झाला. दुर्दैव म्हणजे, अफगाणिस्तानच्या नशिबी तेही नव्हते. आजतागायत भारताचा हा मित्रदेश अजूनही एक राष्ट्र म्हणून उभाच राहू शकलेला नाही. अमेरिकेचे नवे अध्यक्ष ज्यो बायडेन यांनी घोषणा केल्यानुसार न्यूयॉर्कवरील दहशती हल्ल्यानंतर बरोबर दोन दशकांनी अमेरिका अफगाणिस्तानातील आपले सारे सैन्य माघारी नेत आहे. बागराम हा अमेरिका व नाटो दोस्तांच्या ताब्यातला बागराम हवाई तळ नुकताच मोकळा करण्यात आला. हा दोस्त राष्ट्रांचा सगळ्यांत महत्त्वाचा तळ होता. अजूनही अफगाण भूमीवर काही हजार अमेरिकी सैनिक आहेत. क्रमाक्रमाने तेही जातील. १९७९ च्या शेवटच्या आठवड्यात काबूलमध्ये रशियन रणगाडे शिरले होते. त्यानंतर, कोणत्याही परकीय फौजा भूमीवर नाहीत, असा कालखंड अफगाणिस्तानच्या इतिहासात प्रथमच येणार आहे. मात्र, तो सुटकेचा नि:श्वास टाकण्यास पुरेसा नाही. उलट, भीतीची धडकी भरविणाराच आहे. अफगाणिस्तानचे ४०७ जिल्हे आहेत. त्यातील ७९ तालिबान्यांच्या ताब्यात होते. अमेरिका माघारी जाते आहे, म्हटल्यावर ही संख्या १५७ झाली. कदाचित, आणखी दीडशे जिल्हेही लवकरच तालिबानी जिंकून घेतील. याचा अर्थ, अफगाणिस्तानच्या ज्या सरकारला आज मान्यता आहे, त्याच्या ताब्यात कमी भूभाग राहील आणि काही काळाने तोही जाईल. थोडक्यात, चार दशकांच्या संघर्षानंतर अफगाणिस्तान हा इस्लामी मूलतत्त्ववादी आणि मध्ययुगीन कायदे राबविणाऱ्या दहशती तालिबान्यांच्या अमलाखालचा देश बनणार आहे. भारतासाठी ही अत्यंत धोक्याची आणि कटकटीची गोष्ट आहे. पाकिस्तान तालिबान्यांचा पाठीराखा तर आहेच; पण भारतीय उपखंडातील शांततेला नख लावण्यासाठी इस्लामाबादला एक हक्काचा साथीदार मिळणार आहे. गेल्या काही वर्षांमध्ये अफगाणिस्तानात भारताने खूप कामे केली आहेत. त्यासाठी शेकडो भारतीय अभियंते व इतरही तज्ज्ञ तेथे आहेत. रस्ते, धरणे, इमारती तर आहेतच; पण काबूलमधील नव्या अफगाण संसदेचे कामही भारतीय वास्तुविशारद आणि अभियंत्यांनी केले आहे. मात्र, ज्या तालिबान्यांना बमियाँ येथील प्राचीन आणि नितांतसुंदर बुद्धमूर्तींचे महत्त्व वाटले नाही, त्यांना भारताच्या या कामाचे काही महत्त्व वाटेलच, हे सांगता येत नाही. काबूलमधील सत्ताकारणात महत्त्वाच्या ठरणाऱ्या तालिबान्यांशी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी दोहा येथे नुकतीच चर्चा केली, अशा बातम्या येत होत्या. त्या बातम्यांचा आता परराष्ट्र खात्याने इन्कार केला असला तरी अमेरिका निघून गेल्यानंतर भारताची काळजी वाढली आहे, यात काही शंका नाही. तसे नसते तर परराष्ट्र खात्याने अफगाणिस्तानातील भारतीयांच्या सुरक्षेसाठी सूचनावली जारी केली नसती. ज्यांना शक्य आहे आणि परवडते आहे, अशा शेकडो अफगाण नागरिकांनी काबूलच्या विमानतळावर गर्दी केली आहे. त्यांना आपली मायभूमी सोडून जायचे आहे. ज्या देशातील शिकलेली, शहाणी माणसे असा देश सोडून चालली आहेत, त्या देशाचे भवितव्य कसे असेल, याची कल्पना करता येते. अनेक टोळ्यांचे अस्तित्व आजही असणाऱ्या, आतून स्वत: अशांत आणि चहुबाजूंनी अस्थिर देशांचा वेढा पडलेल्या, क्रूर दहशतवादाने ग्रासलेल्या आणि गरिबीने पीडलेल्या या देशाचे पुढे काय होणार, हा जसा प्रश्न आहे; तसाच या नव्या परिस्थितीचा भारतावर काय परिणाम होणार, हाही प्रश्न आहे. अमेरिकेला सोयीने दहशतवाद जोजवायचा किंवा संपवायचा असतो. पण बाटलीतून निघालेली भुते परत आत जात नाहीत. त्यामुळे, तालिबान्यांच्या काही टोळ्या आणि पाकिस्तानी राज्यकर्ते व आयएसआय यांचे लक्ष काश्मीरकडे जाईलच. किंबहुना, भारतात अशांतता माजवण्यासाठी पाकिस्तानला आता जोर चढू शकतो. त्यातच, काबूलमध्ये दोन्ही महासत्तांचे हात पोळल्यानंतर तिसरी महासत्ता चीन तेथे निराळ्या रीतीने जम बसविण्याचा प्रयत्न करणार, हे उघड आहे. गरीब किंवा गरजू देशांना आर्थिक मदत किंवा छुप्या कर्जांच्या माऱ्याने अंकित करावयाचे आणि नंतर त्यांचे एकेक भूप्रदेश, बंदरे, विकासाचे हक्क, खनिजे हे सारे ताब्यात घ्यायचे, ही चीनची रीत आहे. याची सुरुवात म्हणून पेशावर–काबूल हा महामार्ग चीन लवकरच बांधेल. चीन–पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉरमध्ये अफगाणिस्तानचा समावेश करण्यासाठी चीन उत्सुकच असेल. या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रसंघ आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटनांनी अफगाणिस्तानात कामे चालू ठेवणे, हाच पर्याय आहे. गेल्या दहा वर्षांत तेथे हजारो मुले अनाथ झाली असून ती शक्य तिथे अहोरात्र राबत आहेत. त्यांचा अमली पदार्थांचा व्यापार तसेच दहशतवादासाठी वापर होतो. अशावेळी, काबूलमधील आजच्या आणि उद्याच्या सत्ताधाऱ्यांशी संवाद चालू ठेवून शक्य तितका काळोख कमी करणे आणि नवा आव्हानकाळ आपल्यासाठी व जगासाठी सुसह्य करणे, इतकेच भारताला शक्य आहे.

# श्रीवर्धन येथील गोखले महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांची अडवणूक ; पूर्ण फी भरा मगच रिझल्ट घेऊन जा

**दै.रायगड नगरी । संतोष चौकर**

**श्रीवर्धन** : श्रीवर्धन येथे गोखले एज्युकेशन सोसायटीचे वाणिज्य व विज्ञान शाखेचे कनिष्ठ महाविद्यालय आहे. तसेच कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे महाविद्यालय आहे. २०२० सालच्या मार्च महिन्यामध्ये संपूर्ण भारत देशामध्ये कोरोना महामारीचा संसर्ग टाळण्यासाठी लॉकडाऊन करण्यात आला. त्यामुळे देशातील सर्व शाळा, महाविद्यालये बंद ठेवण्यात आली.

या वेळी दहावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या अनेक विद्यार्थ्यांनी अकरावीच्या वाणिज्य व विज्ञान शाखेमध्ये प्रवेश घेतला होता. मात्र कनिष्ठ महाविद्यालय बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांचे ऑनलाईन क्लासेस महाविद्यालयाकडून सुरू करण्यात आले होते. परंतु अनेक वेळा नेटवर्क नसल्यामुळे किंवा ऑनलाइन लेक्चर घेणारा प्राध्यापक नेटवर्क नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण पाहिजे त्या प्रमाणात होत नव्हते.

त्यानंतर कोरोना रुग्णांची संख्या कमी होऊ लागल्यानंतर कॉलेजचे नियमित वर्ग सुरू करण्यात आले. परंतु ते देखील फक्त अडीच महिनेच चालले. असे असताना देखील महाविद्यालयाने विद्यार्थ्यांची ऑनलाइन परीक्षा घेऊन त्याचा निकाल जाहीर केला आहे. परंतु रिझल्ट घेताना विद्यार्थ्यांनी संपूर्ण फी भरल्याची पावती दाखवल्या नंतरच रिझल्ट देण्याचे कॉलेजने कळविले होते. अनेक विद्यार्थ्यांचे पालक कोरोना महामारीमुळे बेकार आहेत. अनेकांच्या नोकऱ्या गेलेल्या आहेत. तर अनेकांचे छोटे–मोठे धंदे बंद पडलेले आहेत. असे असताना शासनाकडून देखील सर्व शाळा व महाविद्यालयांना ही बाबत अडवणूक करू नये अशा सूचना दिलेल्या असताना, श्रीवर्धन येथील गोखले कनिष्ठ महाविद्यालया कडून विद्यार्थ्यांची फी संपूर्ण वसूल केल्यानंतरच रिझल्ट देण्यात येत आहेत. राज्य परिवहन महामंडळा मध्ये काम करणाऱ्या अनेक पालकांचे पगार वेळेवर होत नसल्यामुळे तसेच पगार काही प्रमाणात झालेले नसल्यामुळे त्यांच्याकडे फी भरण्यासाठी पैसे उपलब्ध नसल्याने आपल्या मुलांसाठी ते रिझल्ट घेऊ शकले नाहीत. काही पालकांनी उधार पैसे घेऊन कॉलेजमध्ये येऊन फी भरल्यानंतर रिझल्ट देण्यात आला. कारण अकरावीचे रिझल्ट मिळाल्यानंतरच बारावी मध्ये प्रवेश घेता येणार असल्याने अनेकांची बारावीच्या प्रवेशासाठी धडपड सुरू होती. परंतु गोखले महाविद्यालयाच्या प्रशासनाकडून विद्यार्थ्यांना फी भरण्याबाबत अडवणूक करण्यात येत असल्याचे पहायला मिळत होते. तरी राज्याच्या शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी या प्रकाराकडे लक्ष द्यावे अशी मागणी पालकांमधून केली जात आहे.

## नवबौध्द तरुणांसाठी मार्जिन मनी योजनेचा लाभ घेण्यासाठी समाज कल्याण विभागाशी संपर्क साधावा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

केंद्र सरकाच्या स्टँड अप इंडिया योजनेंतर्गत उद्योग करु इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील नवउद्योजकांना भराव्या लागणाऱ्या २५ टक्के हिश्श्याच्या रकमेपैकी १५ टक्के रक्कम सामाजिक न्याय विभागामार्फत मार्जिन मनी म्हणून देण्यात येणार आहे. त्यामुळे नव उद्योजकांना केवळ १० टक्के स्वहिस्सा भरावा लागणार आहे. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील नवउद्योजकांनी मार्जिन मनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी रायगड जिल्ह्याच्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, कोकण विभाग श्रीमती वंदना कोचुरे यांनी केले आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त केंद्र सरकारने स्टँड अप इंडिया ही योजना जाहीर केली आहे.

## ऐन लावणी हंगामात पावसाने मारली दडी ; दुबार पेरणीचे संकट, बळीराजा हवालदिल

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

भारतीय हवामान खात्याने यावर्षी मुबलक पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली होती. त्यानुसार या वर्षी पावसाने वेळेवर हजेरी लावली. त्यामुळे जिल्ह्यातील बळीराजा सुखावला होता. पावसाच्या नियमित आणि प्रमाणात पडण्याने भात शेतीचे बियाणे अगदी शंभर टक्के रुजवा झाला होते. मात्र मागील दहा दिवस पावसाने दडी मारल्याने अनेक शेतकरी हवालदिल झाले आहेत. रोपांची वाढ झाल्याने लावणीचा हंगाम सुरू झाला असतानाच पाऊस बंद झाल्याने अनेक शेतकऱ्यांच्या शेतात पाणीच राहिलेला नाही. अशा वेळी ज्यांच्या शेताच्या आजूबाजूला पाण्याची सोय आहे त्यांनी आपले मोटरपंप बाहेर काढून पाणी देत आहेत. मात्र इतर शेतकरी मात्र चिंतातुर आहेत.

शेतात पाणी राहिले नसल्याने दुबार पेरणीचे संकट ओढवण्याची भीती वाटते आहे. पण ते आता शक्यही वाटत नाही असे एका शेतकऱ्याने सांगितले. भात लावणीचा हंगाम पुढे गेला तर त्याचा परिणाम उत्पादनावर होऊन पीक कमी येते त्यामुळे वेळेतच लावणी होणे आवश्यक आहे.

काही शेतकरी पेट्रोल किंवा डिझेल पंप लावून शेतात नदी नाल्यातून पाणी उपसा करून भात लावणी करत आहेत. मात्र पेट्रोल डिझेल चे वाढलेले भाव पाहता शेतकऱ्यास ते परवडणारे नाही. मागीलवर्षी रायगड मध्ये अतिवृष्टी होऊन बहुतांश पिकांचे नुकसान झाले होते. मात्र पीकविम्याचे पैसे अजूनही मिळाले नाहीत. अशातच या वर्षी पीक विमा करण्यापूर्वीच पावसाने दडी मारल्याने होणारे नुकसान विमा कंपनी देईल का याचीही चिंता अनेक शेतकऱ्यांना भेडसावत आहे. अशी माहिती सुधागड तालुक्यातील शेतकरी निलेश शिर्के यांनी दिली. काहींनी आगाऊ रक्कम देऊन मजूर घेऊन ठेवले आहेत.

पण पाणी नसल्याने लावणी कशी करावी हा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. हवामान खात्याच्या अधिकृत वेबसाईटवर मिळालेल्या माहिती नुसार जिल्ह्यात १ ते ४ जुलै दरम्यान सर्वसाधारण १८३.७ मिलिमीटर पाऊस पडतो. पण यंदा तो अवघा १८.२ मिलिमीटर पडला आहे. म्हणजे तब्बल नव्वद टक्के कमी पडला. रविवारी (ता.४) तर अवघ्या १ मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

## २०१४ च्या ईएसबीसी उमेदवारांना राज्य शासनाचा दिलासा : ना.अशोक चव्हाण

**दै.रायगड नगरी । मुंबई**

२०१४ च्या ईएसबीसी उमेदवारांना राज्यशासनाने मोठा दिलासा दिला असून, उच्च न्यायालयाची स्थगिती येण्यापूर्वी झालेल्या नियुक्त्या तसेच स्थगिती आल्यानंतर ११ महिन्यांच्या तात्पुरत्या नियुक्त्या मिळालेल्या उमेदवारांना सेवेत कायम करण्याचा निर्णय अशोक चव्हाण यांनी विधानसभेत जाहीर केला.



याबाबत माहिती देताना सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या न्यायालयीन लढ्यामुळे रखडलेल्या नोकर भरती प्रक्रिया मार्गी लावण्याच्या हेतूने हे निर्णय घेण्यात आले आहेत. उच्च न्यायालयाची स्थगिती येण्यापूर्वी नियुक्त झालेल्या तसेच स्थगिती आल्यानंतर खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्यांच्या नियुक्त्या मिळालेल्या उमेदवारांना या निर्णयाचा लाभ मिळेल.

मराठा आरक्षणाचे न्यायालयीन प्रकरण, त्यावर आलेली स्थगिती व अंतिम निकाल, तसेच कोरोनामुळे अनेक नोकर भरती प्रक्रिया रखडल्या आहेत. त्यातील अनेक एसईबीसी उमेदवारांचे वय विहित मर्यादेपलिकडे चालले होते, शिवाय एसईबीसी आरक्षण रद्दबातल झाल्यामुळेही अनेक विद्यार्थी वयोमर्यादा ओलांडणार होते. एसईबीसीच्या अशा उमेदवारांना दिलासा देण्यासाठी त्यांच्यासाठी वयोमर्यादा ४३ वर्षे करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतल्याची माहिती अशोक चव्हाण यांनी दिली. त्याचप्रमाणे या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कातील सवलतीचा लाभही अनुज्ञेय केल्याचे त्यांनी सांगितले.

९ सप्टेंबर २०२० रोजी मराठा आरक्षणाच्या अंमलबजावणीवर निर्बंध येण्यापूर्वी एसईबीसी मधून निवडीसाठी शिफारस झालेल्या परंतु, अद्याप नियुक्त्या न मिळालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्यासंदर्भात ज्येष्ठ विधीज्ञांचे कायदेशीर मत मागवण्यात आले असून, त्यानंतर त्याबाबतचा निर्णय घेतला जाईल. अपूर्णावस्थेतील अर्थात अद्याप निवड यादी न लागलेल्या नोकर भरती प्रक्रियांमधील एसईबीसी उमेदवारांना ईडब्ल्यूएस किंवा खुल्या प्रवर्गातून पर्याय उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्य सरकारने यापूर्वीच घेतला असून, उमेदवारांनी निवडलेल्या पर्यायानुसार या निवड प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना राज्य लोकसेवा आयोग तसेच अन्य निवड मंडळांना देण्यात आल्याचे अशोक चव्हाण पुढे म्हणाले.

## नागरिकांनी आठवड्यातील एक दिवस कोरडा दिवस म्हणून पाळण्याचे जिल्हा हिवताप अधिकाऱ्यांचे आवाहन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्यात डेंगी तापविषयी जनजागृतीसाठी विविध उपाययोजनेंतर्गत जलद ताप सर्वेक्षण, कीटकजन्य आजारांच्या माहितीचे प्रदर्शन, गप्पी मासे सोडणे, हस्तपत्रिका वाटप व्हेंट पाईपला जाळ्या, कापड लावणे, प्रभात फेरी, गट सभा घेणे इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

डेंगी ताप (हाडमोडी ताप) हा एक विषाणूजन्य आजार असून तो विषाणूमुळे होतो व एडीस इजिप्टाय या डासामार्फत या आजाराचा प्रसार होतो. या तासाला टायगर मॉस्किटो असे म्हणतात. हा डास दिवसा चावतो. यामध्ये रुग्णाला तीव्र स्वरुपाचा ताप येतो. त्वरित औषधोपचार न झाल्यास रुग्णाला रक्तस्राव होऊन रुग्णाचा मृत्यू होऊ शकतो. याच्या लक्षणांमध्ये ताप, अंगदुखी, डोकेदुखी, अशक्तपणा, अंगावार लाल रंगाचे पुरळ येणे अशा लक्षणांचा समावेश आहे. अंगदुखी अधिक असल्याने यास हाडमोडी ताप असे म्हणतात.

या आजाराच्या प्रसारासाठी कारणीभूत असणाऱ्या एडीस इजिप्टाय (टायगर मॉस्किटो) या डासाची उत्पत्ती स्वच्छ साठलेल्या पाण्यात होते. पावसाचे स्वच्छ पाणी, फेकून दिलेले टायर्स, भंगार सामान, शहाळी यामध्येही या डासांची उत्पत्ती होते. त्यामुळे पाणी साठवण, सर्व भांडे, रांजण, हौद हे आठवड्यातून एक दिवस घासून पुसून कोरडे करणे आवश्यक आहे. तसेच पाणी साठे झाकून ठेवणे गरजेचे आहे.

या आजाराची लागण झाल्यास नागरिकांनी त्वरित तपासणी करून घ्यावी. ही तपासणी शासकीय दवाखान्यातून मोफत करण्यात येते. तरी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळावा, या दिवशी घरातील सर्व पाणीसाठे घासून पुसून स्वच्छ करावेत, असे आवाहन जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.वैशाली पाटील यांनी केले आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## हप्तेखोरांवर नियंत्रण ठेवून वाशी मंडळाने केली ११ कोटीची वसूली

गैरवापर केल्यास उघडकीस आले. पी एम कोल्ड स्टोरेज, व्हीनस कोल्ड स्टोरेज, मीरा मॅक्स, सुरेश फूट वेअर आणि सावला कोल्ड स्टोरेज अशा कोल्डस्टोरेज संस्थांना शेती ते औद्योगिक दराच्या फरकाच्या रकमेची आकारणी करून ३ कोटी ८२ लाख रुपयांची आकारणी केली आहे. तसेच संबंधित वीज ग्राहक शेती व्यवसाय दाखवून वीज वापर करीत होते. त्यामुळे त्यांना शेतीला लागणारे कमी दर वीज वापरता येत होती. परंतु त्यांचा बेकायदा वापर उघडकीस आल्यामुळे त्यांना यापुढे औद्योगिक वीजेचे दर आकारण्यात येणार आहेत. या कारवाईमुळे महावितरणच्या महसुलात वाढ होण्यास मदत मिळणार आहे. गेल्या वर्षभरात वाशी मंडळातर्फे राजाराम माने हे ही धडक कारवाई करीत असल्याने या विभागातील बेकायदा वीज वापर करणाऱ्या कंपन्या आणि मध्यस्थी करणारे दलाल यांचे धाबे दणाणले आहेत. भांडुप सर्कल अंतर्गत दलालांच्या अशा अनेक टोळ्या सक्रिय आहेत. या टोळ्यांमध्ये महावितरणच्या कल्याण येथील आयटी विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश असल्याची चर्चा महावितरणच्या वर्तुळात सुरू आहे. या टोळ्या फुटीर अधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन विजेचा गैरवापर करणाऱ्या कंपन्यांना मदत करतात. अशा टोळ्यांवरही मोठी कारवाई करण्याचे संकेत महावितरणमधून मिळत आहेत.

## सरकारी कामात अडथळा व हुज्जत घालणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल

पोलिस हवालदाराविरूद्ध हुज्जत घालून, कॉलर पकडून धक्काबुक्की करून कठड्यावर पाडून सरकारी गणवेशाची नेमप्लेट पिनसकट उखडून गणवेशाच्या शर्टाचे बटण तोडून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## मुंबई गोवा महामार्गाला बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव द्यावे

क्लब कडे कळवावे असा ठराव झाला. जिल्ह्यला व राज्याला कौतुकास्पद असा कार्यक्रम प्रगतशील शेतकरी सन्मान कार्यक्रम प्रत्येक तालुक्यात व्हायला हवा असे स्पष्ट करण्यात आले. याशिवाय जिल्हा कार्यकारिणीची पुढील मीटिंग मुरुड येथे होईल असे जाहीर करण्यात आले. याबरोबरच जिल्हा प्रेस क्लब चा पुढील १७ वा वर्धापनदिन माणगाव येथे होणार असून त्याबाबत नियोजनास सुरुवात करावी असे ठरले आहे.

या जिल्हा कमिटी च्या बैठकिसाठी जिल्हा प्रेस क्लब अध्यक्ष भारत रांजणकर , कार्याध्यक्ष मनोज खांबे, माजी अध्यक्ष अभय आपटे, माजी अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, उपाध्यक्ष प्रशांत गोपाळे, जिल्हा सचिव शशिकांत मोरे,जिल्हा संपर्क प्रमुख भारत गोरेगावकर, जिल्हा संघटक संजय भुवड, जिल्हा सदस्य पदमाकर उभारे, देवा पेरवी, मुकुंद बेबडे, भाई ओव्हाळ, प्रवीण जाधव, राजेंद्र जाधव, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख कमलेश ठाकूर आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी आयोजक माणगाव प्रेस क्लब चे अध्यक्ष संतोष सुतार, कार्याध्यक्ष गौतम जाधव , उपाध्यक्ष विश्वास गायकवाड, आरती म्हामूनकर, सचिव हरेश मोरे, खजिनदार सचिन वनारसे, कायदेशीर सल्लागार, डॉ. संजय सोनावणे, प्रमुख संघटक पदमाकर उभारे, प्रमुख सल्लागार उत्तम तांबे, विनोद सापळे तसेच सदस्य वैभव टेंबे, योगेश ढेपे, पूनम धुमाळ आदी नि योग्य आयोजन केले. शेवटी जिल्हा प्रेस क्लब च्या सर्व पदाधिकाऱ्यांचे जिल्हा सदस्य तथा माणगाव प्रेस क्लब चे संघटक पदमाकर उभारे यांनी आभार मानले.

## खांदा कॉलनीतील भाजप व मनसेचे कार्यकर्ते शिवसेनेत दाखल

संघटिका सौ. संचिता राणे, शहर संघटिका सानिका मोरे, आस्मा खान यांच्यासह आदी शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

## जसखार गावातील दिव्यांग बांधवांनी ठेवला नवा आदर्श ; निराधार मुलीला केली आर्थिक मदत

**दै.रायगड नगरी । उरण**

कोरोना काळात सर्व दीव्यांग व्यक्ती त्रस्त असताना जसखार गावाचे ग्रामसेवक–राजेंद्र सात्संगे यांनी दिव्यांग व्यक्तींना शासनाकडून आलेल्या ५% निधीचे वाटप केले.




जसखार गावात सध्या एकूण १२ दिव्यांग व्यक्ती असून प्रत्येकाला अंदाजे १३,५००/– रुपये निधी मिळाला. हा निधी मिळाल्याने सर्व दिव्यांग बांधावा मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे ह्या सर्व दिव्यांग बाधवांनी आपल्याला मिळालेल्या रकमेतून प्रत्येकी ५००/– वर्गणी काढून जसखार गावातील मानसी प्रकाश ठाकूर या निराधार मुलीला दहा हजार रुपये दिले. निराधार मुलीला आर्थिक मदत केली. जसखार गावातील या अपंग बांधवांचे सर्वत्र कौतुक होत असून एक नवा आदर्श या अपंग बांधवानी निर्माण केला आहे. स्वतः ला मिळालेल्या निधीतून निराधार मुलीला मदत करण्याची घटना प्रथमच घडली आहे.त्याबद्दल सर्वांनी त्यांचे कौतुक केले. सदर कार्यक्रमास जसखार गावाचे उपसरपंच शैलेश ठाकूर, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक–राजेंद्र सात्संगे, उरण तालुका दिव्यांग प्रतिनिधी महेंद्र म्हात्रे, पंचायत समिती सदस्य दीपक ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते प्राध्यापक राजेंद्र मढवी आदी मान्यवर उपस्थित होते. समीर ठाकूर अपंग प्रतिनिधी जसखार यांनी सर्वांचे आभार मानले.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**



### गाळा विकणे आहे

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९३२१५९२११३/८१०४४७७४०


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## शामल मोहन पाटील एज्युकेशन सोसायटीमध्ये प्रशिक्षण शिबिराचे उदघाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बचत गट महिलांसाठी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे शामल मोहन पाटील एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात संस्थापक अध्यक्ष सतीश मोहन पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

तसेच बबनदादा पाटील (शिवसेना रायगड जिल्हा सल्लागार) यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सदर कार्यक्रमास सौ.सोनल कमाने शाखाधिकारी रायगड बँक) नितेश तोंडसे (बँक रोखपाल) सौ. सोनल इंगवले (बचत गट सहा.) तसेच जॅकी सर व श्री राणे सर उपस्थित होते.



## तारणे आदिवासीवाडी येथे जीवनावश्यक वस्तूंचे आणि छत्र्या व मिठाई तसेच वह्यांचे वाटप

**दै.रायगड नगरी । तळा**

दिप जनसेवा समिती, मुंबई यांच्या वतीने समाजसेवक व उद्योजक सुनिल साळुंखे आणि परिवार यांच्या वतीने तारणे आदिवासी वाडी येथील ३५ कुटुंबियांना जीवनावश्यक अन्न धान्याच्या वस्तूंचे वाटप तसेच बामणघर गौळवाडी येथील रहिवासी व सद्या मुंबईस्थित असणारे समाजसेवक मनोहर पाडगे व त्यांचे बंधू संतोष पाडगे यांच्या वतीने तारणे येथील त्यांचे मामा कार्यसम्राट माजी पोलीस पाटील व समाजसेवक कै. गजानन दगडू गवळी यांच्या स्मरणार्थ १५ जेष्ठ नागरिकांना छत्र्या व मिठाई वाटप तसेच शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनींना वह्यांचे वाटप करण्यात आले.

आगामी दिवाळी देखील याच आदिवासी बांधवांसोबत साजरीकरण्याचे अभिवचन सुनील साळुंखे यांनी उपस्थित बंधू भगिनींना दिले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून स्वप्नाली साळुंखे, सौ.घाग, विकास साळुंखे, बॉम्बे हॉस्पिटलचे विनोद कडव, केईएम हॉस्पिटलचे दिपेश हेलगावकर, दिपा हेलगावकर, नगरसेवक चंद्रकांत भोरावकर, मंगेश शिगवण, प्रकाश गायकवाड, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष महेंद्र कजबजे, अब्बासभाई गोलंदाज राकेश कासार, महादेव घागरूम, भऊड, सौरभ पाडगे तसेच ग्रामस्थ व महिला बहुसंख्येने उपस्थित होते.

सदरचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राकेश कासार व तारणे ग्रामस्थ आदिवासीवाडी ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन माधुरी जाधव यांनी केले.

# उरण तालुक्यात पावसाने दडी मारल्याने कडक उन्हामुळे भाताची रोपे करपली

## दुबार पेरणीचे संकट आल्याने बळीराजा हवालदिल

**दै.रायगड नगरी । उरण**

मागील दिड आठवड्या पासून पावसाने दडी मारली आहे. त्यात तळपत्या उन्हामुळे भाताची रोपे मोठ्या प्रमाणात करपू लागली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट येऊन ठेपल्याने उरण तालुक्यातील बळीराजा हवालदिल झाला आहे.

मे महिन्यात झालेल्या चक्री वादळासह झालेल्या पावसामुळे जमिनीची आगोदरच धूप निघून गेली. त्यात जून महिन्याच्या सुरवातीलाच मोठा पाऊस झाला. शेतकऱ्यांना खारपट्टीच्या शेतीत पेरणी ही करता आली नाही. ज्या शेतकऱ्यांची उंचवट्या भागात शेती आहे. त्यानी भाताची पेरणी केली. तीही जास्त पावसामुळे रोपे योग्य प्रमाणात निघाली नाहीत. त्यामुळे बळीराजा संकटात अडकला आहे.



त्यांनतर दिवसात अधून - मधून लहान, मोठ्या पावसाच्या येणाऱ्या सरींमुळे दोन-चार दिवसात रोपे उगवण्यास सुरवात झाली होती.याशिवाय मध्यनंतरीच्या आठवड्यात शेतीला पूरक पाऊस होत असल्याने रोपीही जोमाने वाढू लागली होती. त्यामुळे येथील बळीराजा आनंदाने सुखावला होता. शेतीच्या मशागतीत मग्न झाल्याचे चित्र तयार झाले होते. मात्र मागील काही दिवसापासून पावसाने दडी मारली मारल्याने तळपत्या उन्हात रोपे करपूल गेली आहेत. त्यामुळे येथील शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.

मोठ्या जोमाने शेतीच्या कामात मग्न झालेल्या शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट कोसळले आहेत. अगदी भर पावसाळ्यात कधी न्हवे एवढे उष्णतेचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मित्र असलेल्या सापांनीही आपला मोर्चा मानवी वस्तीकडे वळविला आहे.सध्याच्या काळात शेतीमधील उत्पन्नापेक्षा शेतीची मशागत आणि खर्च अधिक होत असतांना येथील शेतकरी मोठ्या इर्षेने भातशेती सुपीक ठेवण्यासाठी अधिकाधिक मेहेनत करीत आहेत.

मात्र मागील आठवड्या पासून पावसाने दडी मारल्याने भाताची रोपे करपून पिवळी पडल्याने शेतकरी चिंतातुर झाला आहे. एक-दोन दिवसात पावसाने हजेरी लावल्यास काही प्रमाणात पिकांना जीवदान मिळेल अशी आशा शेतकरी करीत आहेत. अधिक रोपे करपलेल्या शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट सध्या ओढावले आहे.

# रत्नाकर पाटील यांचा वाढदिवस पर्यावरणपूरक वृक्षारोपणाने संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

दिवसेंदिवस पर्यावरणाचा समतोल बिघडत असून मोठ्या प्रमाणावर होत असलेली वृक्षतोड, जंगलांचा नाश या बाबी त्यासाठी कारणीभूत आहेत. पर्यावरणाच्या बिघडलेल्या समतोलामुळे अनियमित व अपूर्ण पर्जन्यमान, भयानक उष्णता अशा संकटांना तोंड देणे भाग पडत आहे. यावर प्रभावीपणे मात करायची असल्यास काळाची गरज ओळखून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण व त्याचे संवर्धन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष तथा रायगड शिव सम्राटचे संपादक रत्नाकर पाटील यांनी त्यांच्या वाढदिवसादिनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

पनवेल तालुक्यातील सतीची वाडी येथे शिवतेज मित्र मंडळ नवीन पनवेल आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नवीन पनवेल शिवसेनेचे नेते आनंद पाटील, सामाजिक कार्यकर्ते नितीन चोरघे, पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे उपाध्यक्ष तथा दैनिक पुढारीचे प्रतिनिधी दीपक घोसाळकर, खजिनदार तथा आर्या प्रहरचे संपादक सुधीर पाटील, सचिव तथा दैनिक लोकमतचे प्रतिनिधी मयूर तांबडे, ज्येष्ठ पत्रकार प्रदिप ठाकरे, रसायनी टाईम्सचे संपादक अनिल भोळे, पनवेल वैभवचे संपादक अनिल कुरघोडे, रायगड शिव सम्राटचे प्रतिनिधी सुभाष वाघपंजे, वतन कर्नाळाचे प्रतिनिधी चंद्रशेखर भोपी, दैनिक कृषिवलचे प्रतिनिधी राजेश डांगळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रास्ताविकात उपाध्यक्ष दीपक घोसाळकर यांनी वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्याचा हेतू मांडला. त्यानंतर मार्गदर्शन करताना वनस्पती तज्ञ सुधीर पाटील यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व मांडले. यावेळी त्यांनी पनवेल तालुका पत्रकार महासंघ तसेच शिवतेज मित्र मंडळ हे काम निश्चितपणे करू शकते, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी शिवसेनेचे नेते आनंद पाटील यांनी वृक्षारोपण किती महत्त्वाचे आहे याचे महत्त्व विशद केले. वनसंपदेवर मानवाची बरीचशी कामे अवलंबून असून वृक्षांचे रोपण व संवर्धन होणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी म्हटले. तर राष्ट्रीय कर्तव्य म्हणून या मोहिमेत सहभागी व्हावे, अशी अपेक्षा सामाजिक कार्यकर्ते नितीन चोरघे यांनी व्यक्त केली. यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रदिप ठाकरे म्हणाले की, आजही बहुतांश ठिकाणी भरपूर प्रमाणात वृक्षतोड होत असल्यामुळे वनक्षेत्र कमी होत आहे. यामुळे कडक उन्हाळा, जागतिक तापमान वाढ, प्रदूषण अशा अनेक समस्या आपल्यासमोर येत आहेत. म्हणूनच पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष रत्नाकर पाटील यांच्या वाढदिवसादिनी आयोजित केलेला हा स्तुत्य उपक्रम नक्कीच योग्य असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना ज्येष्ठ पत्रकार अनिल भोळे म्हणाले की, आपल्या परिवारात जन्माला येणाऱ्या बालकांच्या जन्माचे स्वागत करण्यासाठी शुभेच्छा वृक्ष, गावातील ज्या तरुणांचे विवाह होतील त्यासाठी शुभमंगल वृक्ष, कौतुक सोहळ्यासाठी आनंद वृक्ष आणि मृत व्यक्तीच्या स्मृती जपण्यासाठी स्मृती वृक्ष लावण्यात यावेत, असे आवाहन केले. उपस्थितांचे आभार व्यक्त करताना सचिव मयूर तांबडे यांनी, वृक्षलागवड हा निवळ एक सरकारी उपक्रम न राहता ही एक लोकचळवळ व्हावी, यासाठी पनवेल तालुका पत्रकार महासंघ तसेच शिवतेज मित्र मंडळ यांनी पुढाकार घेतला असून अन्य सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यावा, जेणेकरून पर्यावरणाचा समतोल राहील, असेही ते म्हणाले.

# महेंद्र चौलकर यांना पितृशोक

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष महेंद्र चौलकर यांचे वडिल मनोहर रामचंद्र चौलकर यांचे वयाच्या ९० व्या वर्षी शनिवार दि.२६ जून २०२१ रोजी सकाळी११.३० वा.अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दु:खद निधन झाले.



मनमिळावू स्वभाव शेतकरी धार्मिक असलेल्या मनोहर चौलकर यांचा परिसरातील विविध सामाजिक कौटुंबिक कार्यात सहभाग होता. ते उत्कृष्ट धावपटू होते.रायगड किल्ला सर करण्यासाठी आयोजित ज्येष्ठ नागरिकांच्या स्पर्धेत अग्रेसर होते. दररोज सकाळी आठ कि.मी.मॉर्निंग वॉक करीत असत. मुरुड येथे दोन वर्षांपूर्वी झालेल्या स्कुटी अपघातात त्यांच्या पायाला जबर दुखापत झाल्याने राहात्याघरी उपचार सुरू होते. काही दिवसांपूर्वी त्यांना अलिबाग जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, तीन मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य गुरुवार दि.८ जुलै २०२१ रोजी नांदगाव येथील राहात्याघरी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली आहे.

# माथेरानमध्ये मुंबईच्या सामाजिक संस्थेने दिला स्वच्छतेचा संदेश

**दै.रायगड नगरी । माथेरान**

एखाद्या सुंदर उद्यानाला साजेसे उत्तम प्रकारचे पर्यटनस्थळ १८५० मध्ये ठाण्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी सर ह्युज मॅलेट यांच्या नेतृत्वाखाली निर्माण करण्यात आले होते. आज हे टुमदार स्थळ प्रदूषण मुक्त असल्याने जगप्रसिद्ध आहे. बाराही महिने पर्यटकांची गर्दी असल्याने साहजिकच इथे प्लास्टिक बाटल्या, तसेच अन्य खाद्य पदार्थांच्या पिशव्या इतस्ततः विखुरलेल्या आढळतात. ठेकेदाराचे सफाई कामगार सुध्दा स्वच्छता करण्यावर काहीअंशी का होईना पुढाकार घेत असतात.

नगरपरिषदेच्या माध्यमातून स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असते. परंतु काही ठिकाणी ओला कचरा सुका कचरा आढळून येतो. त्यामुळे जंगल भागाचे आपसूकच प्लास्टिक कचऱ्यामुळे नुकसान होते. इथली वनसंपदा अबाधित राहावी या हेतूने मुंबई येथील युथ फॉर ग्लोबल पीस अँड ट्रान्सफॉर्मेशन (वाय.जी.पी.टी.) या संस्थेने माथेरान मध्ये येऊन जवळपास दहा ते पंधरा पिशव्या प्लास्टिक बाटल्या आणि अन्य कचरा संकलन केला आहे. या संस्थेच्या माध्यमातून अनेक सेवाभावी उपक्रम राबविण्यात येतात यामध्ये रक्तदान शिबीर, ट्री प्लांटेशन तसेच बीच क्लीन अप सारखी इतर कामे स्वेच्छेने केली जातात. आज या स्वच्छता मोहीमेत ऋग्वेद सावंत, ऊर्मी कौर, मनश्री राणे, स्नेहा भिवडकर, ध्वनी पारेख, दिव्या त्यागी, भावीका देवरा, सोहम सकपाळ, अर्चित जयकर, संजीव भिवडकर हे उपस्थित होते.



माथेरान मध्ये येऊन या संस्थेने उत्तम प्रकारे स्वच्छता मोहीम राबविली असल्याने त्यांचा आकर्षक फ्रेम भेट स्वरूपात माथेरान नगरपरिषदेचे गटनेते प्रसाद सावंत यांनी देऊन सर्वांचा यानिमित्ताने प्रसाद भाई जनसंपर्क कार्यालयात छोटेखानी सत्कार करण्यात आला.

# वन महोत्सवानिमित्त वटवृक्ष सामाजिक संस्थेच्या वतीने वृक्षारोपण

**दै.रायगड नगरी । उरण**

उलवे येथील वटवृक्ष सामाजिक संस्थेच्या वतीने उलवे सेक्टर १७ रेल्वेलाईन लगतच्या मोकळ्या परिसरात वड, उंबर, पिंपल, आंबा, कडूलिंब, जांभुळ, फणस, बेल, आणि काजू अशा विविध प्रकारचे जीवनदायी देशी वृक्षांचे रोपण करुन वन महोत्सव साजरा करण्यात आले.

उलवे येथील वटवृक्ष सामाजिक संस्था ही वनसंरक्षण,वृक्षारोपण, पर्यावरण क्षेत्रात कार्य करणारी प्रसिद्ध संस्था आहे. पावसाळ्यात वृक्ष लागवडीवर अधिक भर देण्याच्या उद्दिष्टाने आणि उलवे शहरातील पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी सद्यस्थितीला वृक्ष लागवड करणे गरजेचे असल्याने त्याचे गांभिर्य लक्षात घेवुन निसर्गसेवेसाठी संस्थेच्या माध्यमातुन वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आले.


मा.पांडे साहेब यांचे कोर्टात

ॲड.शेखर खोपकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात

क्रि.चौ.अर्ज क्र.६८६/२०२१

ने.ता.०६/०८/२१

श्री.हिरामण सुदाम पाटील
वय : ७८ वर्षे, धंदा : शेती
रा.मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

मा.ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत मोर्बे,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेला या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांची बहिण मयत मंगळी सुदाम पाटील या दि.२२/०६/१९८४ रोजी मौजे : मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. तथापि अनावधानाने मयत मंगळी सुदाम पाटील यांच्या मृत्यू घटनेची नोंद विहित मुदतीत संबंधीत ग्रामपंचायत कार्यालयामध्ये करावयाचे राहून गेले आहे. सबब सदरील अर्ज अर्जदार यांनी मयत मंगळी सुदाम पाटील यांच्या उशिरा मृत्यू घटनेची नोंद करण्याचे आदेश होणेकरिता दाखल केला आहे.

सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. हे सर्व कळावे.

ही नोटीस आज रोजी दि.०५/०७/२०२१ माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्यायालय, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्यायालय, पनवेल**



मा.रावसाहेब कोर्ट

अर्जदारांचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.६५३/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.११/०८/२१

श्रीमती.अनुसया गणेश वाघे
वय : २७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.आदिवासी वाडी (कोल्ही),
पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.वसंत सोन्या वाघे हे दि.०९/१०/२०१८ रोजी आदिवासी वाडी (कोल्ही), ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.वसंत सोन्या वाघे व अन्य हिस्सेदारांचे लाभांत खालील वर्णनाचा भूखंड इरादीत झालेला आहे.

**भूखंड क्र.६ ए, सेक्टर क्र.१६, नवीन पनवेल (प.), क्षेत्र ५००० चौ.मीटर**

अर्जदार या कै.वसंत सोन्या वाघे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मे.इंदुलकर यांच्या कोर्टात

अर्जदाराचे वकील ॲड.मेहबुब गै. पटेल

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात...

क्रि.चौ.अर्ज क्र.५२७/२०२१

नि.नं.७/ड

ने.ता.०५/०८/२१

श्री.अब्दुल करीम कादिर शेख
वय : ४६ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.रुम नं.५३, वाजी मोहल्ला,
जामा मस्जिदजवळ, कोळीवाडा रोड,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

मा.आयुक्त सो./मा.निबंधक सो,
जन्म मृत्यू नोंदणी,
पनवेल महानगरपालिका,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, पै.कासममिया बबनभाई शेख यांचा मृत्यू दि.१४/०३/१९६० रोजी मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील राहत्या घरी झालेला आहे.

वरील पै.कासममिया बबनभाई शेख यांचा मृत्यू दि.१४/०३/१९६० रोजी पनवेल येथे झाला आहे असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदाराने यांनी या मे.कोर्टात मृत्यू दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. पै.कासममिया बबनभाई शेख यांचे मृत्यूबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांना मृत्यूदाखला देण्याची ताबडतोब कार्यवाही करेल.

आज दि.०५/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्याानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**



मा.मुजावर सो

अर्जदारातर्फे वकील ॲड.प्रितम शा.वासकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.७४७/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.०६/०८/२१

कै.पुंडलिक बालाजी घरत (मयत) तर्फे वारस
कै.जानकीबाई उर्फ जानकूबाई पुंडलिक घरत (मयत) तर्फे वारस
१) श्री.रमेश पुंडलिक घरत
वय : वर्षे, धंदा : शेती
२) श्री.गजानन पुंडलिक घरत
वय : वर्षे, धंदा : शेती
३) कै.अरुण पुंडलिक घरत (मयत) तर्फे वारस
३/१) श्रीमती.अनिता अरुण घरत
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
३/२) कु.सृष्टी अरुण घरत
वय : वर्षे, धंदा : शिक्षण
३/३) कु.सुजल अरुण घरत
वय : वर्षे, धंदा : शिक्षण
अ.पा.क.म्हणून अर्जदार क्र.३/१ आई — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, कै. जानकीबाई उर्फ जानकूबाई पुंडलिक घरत ह्या दि.०१/०१/२०१६ रोजी मौजे : वहाळ, ता.पनवेल येथे मयत झालेल्या असून श्री.रमेश पुंडलिक घरत... वगैरे हे त्यांच्या सिडकोने संपादीत केलेल्या खाली वर्णन केलेल्या जमीन मिळकतीचे मोबदल्यात मिळणाऱ्या १२.५ टक्केचे विकसित भूखंडास कायदेशीर वारसदार आहेत.

कै.जानकीबाई उर्फ जानकूबाई पुंडलिक घरत ह्यांचे हिश्यास असलेल्या जमीन मिळकतीचे वर्णन :

| गाव | यु.केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| वहाळ | ४२९ बी | १ | ४ | ०-०२-५ |
| | | १ | ६ | ०-०२-५ |
| वहाळ | ३८० सी | ४७७ | ५ | ०-०७-० |
| | | ५२१ | १ | ०-०१-० |
| | | ५२१ | ४ | ०-०२-० |
| वहाळ | ४०१ | ५१९ | १ | ०-२७-० |
| वहाळ | ४०१ | ४७९ | ३ | ०-०५-० |
| | | ४८४ | ३ | ०-०२-० |
| | | ४४८ | ५ | ०-०७-६ |
| | | ४६५ | १२ | ०-१४-० |
| | | ४६७ | ३ | ०-०९-० |
| | | ४७० | ६ | ०-०६-८ |
| वहाळ | ४२९ | ३७ | ६ | ०-०७-८ |
| | | १४ | ३ | ०-०३-० |
| सोनखार | ७७/१ | १२ | २० | ०-०३-० |
| | | १० | २४ | ०-०१-५ |
| | | १० | २१ | ०-०५-१ |
| | | ७ | १३ | ०-०२-० |
| | | ७ | ६ | ०-२०-६ |
| | | ५ | ४८ | ०-०६-१ |
| | | ५ | ३९ | ०-०४-५ |
| | | ४ | ४ | ०-०९-० |
| | | ३ | १० | ०-०४-३ |
| | | १ | ९ | ०-१३-० |
| सोनखार | ७७/३ | २० | २४<br>पो.ख. | ०-१८-९<br>०-००-८ |

श्री.रमेश पुंडलिक घरत... वगैरे हे कै.जानकीबाई उर्फ जानकूबाई पुंडलिक घरत यांचे कायदेशीर वारसदार आहेत. ह्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत घ्यावी. मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलामार्फत हजर होवून हरकती घ्याव्यात. जर ह्या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती न आल्यास हे मे.कोर्ट श्री.रमेश पुंडलिक घरत... वगैरे ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेणेची कार्यवाही करेल व ते जर कै.जानकीबाई उर्फ जानकूबाई पुंडलिक घरत यांचे वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०५/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

